| विभागाचे नाव- क्रीडा व युवक कल्याण विभाग, मंत्रालय | | | | |
|---|---|---|---|---|
| १०० दिवस कार्यक्रमाची सद्य:स्थितीनिहाय माहिती | | | | |
| अ. क्र. | मुद्दा | कार्यवाही पूर्ण/ अपूर्ण | पूर्ण असल्यास त्याबाबतची माहिती व शासन निर्णय/फोटो/अभिलेख किंवा त्याची लिंक | अपूर्ण असल्यास सद:स्थिती व कार्यवाही पूर्ण करण्याची कालमर्यादा |
| १ | अत्युच्च गुणवत्ताधारक एकूण ३१ खेळाडुंना गट-अ व गट-ब संवर्गातील शासकीय पदांवर थेट नियुक्ती देणे. | कार्यवाही पूर्ण. | क्रीडा विभाग, शासन निर्णय, दि.२७.०३.२०२५ अन्वये अत्युच्च गुणवत्ताधारक एकूण ३१ खेळाडुंना गट-अ व गट-ब संवर्गातील शासकीय पदांवर थेट नियुक्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामध्ये १९ खेळाडुंना क्रीडा विभागातील मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी (प्रशिक्षण) या गट-अ च्या पदावर तर १२ खेळाडुंना क्रीडा विभागातील क्रीडा कार्यकारी अधिकारी (प्रशिक्षण) या गट-ब च्या पदावर थेट नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. | - |
| २ | हँगझोऊ, चीन येथे संपन्न झालेल्या पॅरा आशियाई क्रीडा स्पर्धा, २०२२ स्पर्धेत आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करुन राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या महाराष्ट्र राज्यातील पदक प्राप्त ९ | कार्यवाही पूर्ण. | क्रीडा विभागाच्या दि. २४.०२.२०२५ च्या शासन निर्णयान्वये हँगझोऊ, चीन येथे संपन्न झालेल्या पॅरा आशियाई क्रीडा स्पर्धा, २०२२ स्पर्धेत आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करुन राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या महाराष्ट्र राज्यातील ९ पदक प्राप्त खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना एकूण रु.६९४.३७५ लक्ष इतकी रोख रक्कम पारितोषिक म्हणून प्रदान करण्यात आली आहे.<br>**शासन निर्णयाची लिंक-**<br>https://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%२०Resolutions/Marathi/२०२५०२२४१७२२२२४५२१.pdf | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना एकूण रु.६९४.३७५ लक्ष इतकी रोख रक्कम पारितोषिक म्हणून प्रदान करणे. | | | |
| ३ | क्रीडा संकुलांमध्ये शालेय/महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे. | कार्यवाही पूर्ण. | जिल्हानिहाय क्रीडा संकुलांमध्ये विविध शालेय/महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणेबाबत क्रीडा विभागाच्या दि.२४.०२.२०२५ च्या शासन पत्रान्वये क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार क्रीडा संकुलांमध्ये शालेय/महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. | - |
| ४ | आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या खेळाडुंना व्हीसा मिळण्यास अडचण आल्यास सहकार्य करणे. | कार्यवाही पूर्ण. | आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या खेळाडुंना व्हीसा मिळण्यास अडचण आल्यास त्यांना सहकार्य होण्याकरिता क्रीडा विभागाच्या दि.१७.०४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक कल्याण, मुंबई यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदर नोडल अधिकारी, संबंधित खेळाडूस व्हीसा मिळण्याच्या अनुषंगाने आवश्यक ते मार्गदर्शन करतील, तसेच काही विवक्षित प्रकरणी अडचण असल्यास शासनाच्या राजशिष्टाचार विभागाच्या सहाय्याने संबंधित देशाच्या दुतावासाशी सपंर्क/समन्वय साधून खेळाडूंना सहकार्य करतील.<br>**शासन निर्णयाची लिंक-**<br>https://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%२०Resolutions/Marathi/२०२५०४१७१८२३४९९९२१.pdf | - |
| ५ | सन २०२२-२३ व सन २०२३-२०२४ साठीचे शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करणे. | कार्यवाही पूर्ण. | क्रीडा विभागाच्या दि.१५.०४.२०२५ च्या शासन निर्णयान्वये शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडूंची नावे जाहीर करण्यात आली आणि दि.१८.०४.२०२५ रोजी मा. राज्यपाल महोदय यांच्या हस्ते मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व मा. मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण समारंभ संपन्न झाला.<br>**शासन निर्णयाची लिंक-**<br>https://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%२०Resolutions/Marathi/२०२५०४१६१४३६०९८५२१.pdf | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | **पुरस्कार प्रदान सोहळा-**<br>https://www.youtube.com/live/XU५XdZNX_AI?si=sZdqHCEsO१rNhwJg | |
| ६ | विभागीय क्रीडा संकुल, नागपूर संकुलातील इमारतींच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देणे. | कार्यवाही पूर्ण. | माहे जुलै २०२४ मध्ये विभागीय क्रीडा संकूल, नागपूर करिता रू.१००.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला. त्यापैकी, क्रीडा विभाग, शासन निर्णय दिनांक १५/१०/२०२४ अन्वये रु.४०.०० कोटी निधी वितरीत करण्यात आला व सदर निधी खर्च झाला आहे. तसेच क्रीडा विभाग, शासन निर्णय दिनांक ३१/३/२०२५ अन्वये रु.६०.०० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. विभागीय क्रीडा संकुल, नागपूर येथील इमारतींच्या प्रगतीपथावर असलेल्या बांधकामाची दि.३१.०३.२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांनी पाहणी केली आहे.<br>**शासन निर्णयाची लिंक-**<br>https://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%२०Resolutions/Marathi/२०२५०३२९१७२८२६१९२१.pdf | - |
| ७ | मिशन लक्ष्यवेध-खेळाडूंची निवड, परदेशी मार्गदर्शकांची नियुक्ती करणे. | कार्यवाही पूर्ण. | क्रीडा विभाग, शासन निर्णय, दि.११.०१.२०२४ अन्वये शासनाने मिशन लक्ष्यवेध ही नवीन योजना राज्यात राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अंतर्गत ऑलिम्पिक व आंतरराष्ट्रीय पदकांचे ध्येय गाठण्याकरिता नियोजनबद्ध प्रयत्न करण्यासाठी १२ ऑलिम्पिक क्रीडा प्रकारांवर लक्ष्य केंद्रीत करुन या खेळांचे राज्यस्तरावर हाय परफॉर्मन्स सेंटर, विभागीय स्तरावर स्पोर्टस् एक्सलन्स सेंटर व जिल्हा स्तरावर क्रीडा प्रतिभा विकास केंद्र अशी प्रशिक्षणाची त्रिस्तरीय यंत्रणा उभारण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत तज्ज्ञ व्यक्तींच्या माध्यमातून राज्यातील खेळाडूंच्या क्रीडा कामगिरीनुसार विविक्षित क्रीडा प्रकारांमध्ये खेळाडूंची निवड केली जाणार आहे. सर्वसाधारणतः राज्यस्तरावरील सहभागी/पदक विजेत्या खेळाडूंची निवड जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्रासाठी करण्यात येईल. तर राष्ट्रीय स्तरावरील सहभागी/पदक विजेत्या खेळाडूंची निवड विभागीय स्पोर्टस एक्सलन्स सेंटर करिता करण्यात येईल. राष्ट्रीय स्तरावरील पदक विजेते व भारतीय संघाकरिता निवडलेल्या संभाव्य खेळाडूंमध्ये समावेश | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | असलेल्या राज्यातील खेळाडूंची निवड हाय परफॉर्मन्स सेंटरकरिता केली जाईल. या निवड झालेल्या सर्व खेळाडूंना त्यांच्या कामगिरीनुसार त्रिस्तरीय प्रशिक्षण यंत्रणेच्या ठिकाणी अत्याधुनिक प्रशिक्षण देण्यात येईल. निवडलेल्या खेळाडुंना आवश्यकतेनुसार परदेशात तेथील प्रशिक्षकांमार्फत प्रशिक्षणाची सुविधा देणेबाबत या योजनेत अंतर्भाव करण्यात आलेला आहे.<br>**शासन निर्णयाची लिंक-**<br>https://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%२०Resolutions/Marathi/२०२४०१११९०९१८८५२१.pdf | |
| ८ | विभागीय क्रीडा संकुल, शिंपोली, मुंबई येथे प्रथम टप्प्यात विकसित करण्यात येणाऱ्या क्रीडा सुविधांचे काम पूर्ण करणे. | कार्यवाही पूर्ण. | शिंपोली, मुंबई येथील विभागीय क्रीडा संकुलाच्या पहिल्या टप्प्यातील क्रीडा सुविधांचे काम पूर्ण झाले असून सदर सुविधा जनतेसाठी लवकरच खुल्या करण्यात येतील. | - |
| ९ | विभागीय क्रीडा संकुल, शिंपोली, मुंबई साठी म्हाडा प्राधिकरणाकडून नाममात्र दराने भाडेपट्ट्याने जागा उपलब्ध करुन घेणेबाबत. | कार्यवाही प्रगतीपथावर आहे. | विभागीय क्रीडा संकुल, शिंपोली, मुंबई च्या जागेबाबत संकुल समिती व म्हाडा प्राधिकरण यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. सामंजस्य करारातील अटी व शर्तींच्या अनुषंगाने शासनस्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे. | कार्यवाही प्रगतीपथावर आहे. |
| १० | मिशन लक्ष्यवेध योजनेंतर्गत राज्यस्तरावर ६ क्रीडा प्रकारांकरीता हायपरफॉर्मन्स सेंटर संचालित करण्यासाठी तज्ज्ञ एजन्सीची निवड करणेबाबत. | कार्यवाही प्रगतीपथावर आहे. | मिशन लक्ष्यवेध अंतर्गत निवडण्यात आलेल्या १२ क्रीडा प्रकारांपैकी ०६ क्रीडा प्रकारांचे हाय परफॉर्मन्स सेंटर संचालित करण्यासाठी तज्ज्ञ एजन्सीची निवड करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. ०६ पैकी लॉनटेनिस, ॲथलेटिक्स, रोईंग व वेटलिफ्टिंग या ०४ क्रीडा प्रकारांकरीता तज्ञ एजन्सी अंतिम करण्यात आलेली आहे. हॉकी व कुस्ती या दोन क्रीडा प्रकारांकरीता तज्ज्ञ एजन्सी नियुक्त करण्यासाठी राबविण्यात येणारी निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. | उर्वरित दोन क्रीडा प्रकारांकरिता तज्ज्ञ एजन्सी नियुक्त करण्याची |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | **शासन निर्णयाची लिंक-**<br>https://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%२०Resolutions/Marathi/२०२४०११११९०९१८८५२१.pdf | कार्यवाही १५ दिवसात पूर्ण होणे अपेक्षित आहे. |
| ११ | मिशन लक्ष्यवेध योजनेंतर्गत ०५ खाजगी क्लब /क्रीडा ॲकॅडमी यांना कामगिरीच्या आधारावर अर्थसाहाय्य करणे इ. बाबी पूर्ण करणे. | कार्यवाही प्रगतीपथावर आहे. | मिशन लक्ष्यवेध योजनेंतर्गत ५ खाजगी क्लब /क्रीडा ॲकॅडमी यांना कामगिरीच्या आधारावर अर्थसाहाय्य करण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार १२० संस्थांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. सदर प्रस्तावांची छाननी अंतिम टप्प्यात आहे.<br>**शासन निर्णयाची लिंक-**<br>https://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%२०Resolutions/Marathi/२०२४०११११९०९१८८५२१.pdf | अंदाजे एक महिना अपेक्षित. |
| १२ | अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेकरिता जाताना खेळाडूसोबत प्रशिक्षक व फिजिओथेरपिस्ट घेऊन जाण्यासाठी आर्थिक सहाय्य करणेबाबत. | कार्यवाही प्रगतीपथावर आहे. | शासनास प्राप्त प्रस्तावाची छाननी करुन निर्णय घेण्याची कार्यवाही सुरू आहे. | अंदाजे दोन महिने अपेक्षित. |
| **एकूण कामे-१२,    कार्यवाही पूर्ण झालेली कामे - ८,    प्रगतीपथावरील कामे-४** | | | | |